**ठळक बातम्या**

- कारगिल विजय दिनानिमित्त देशाची वीर शहीदांना आदरांजली
- पर्यावरण रक्षणासाठी प्रधानमंत्र्यांचं मन की बात मधून आवाहन
- केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा पदभार प्रल्हाद जोशी यांनी स्वीकारला

**आणि**

- झिम्बाब्वे-भारत तिसरा टी ट्वेंटी क्रिकेट सामना आज हरारेमधे रंगणार

**<><><><><>**

कारगिल युद्धात हुतात्मा झालेल्या वीर जवानांना देश आज कारगिल विजय दिनानिमित्त आदरांजली वाहत आहे. कारगिल विजय दिनाचा मुख्य कार्यक्रम द्रास येथील कारगिल युद्ध स्मारकावर झाला. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा तसंच लष्करप्रमुख धीरज सेठ आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

कारगिल विजय दिनानिमित्त आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, आणि उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन यांनी वीर सैनिकांना आदरांजली अर्पण केली आहे.

सैनिकांची वीरगाथा देशवासियांना समर्पण आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा देत राहील, असं राष्ट्रपतींनी म्हटलं आहे. आजचा दिवस देशाचं लष्करी सामर्थ्य, राष्ट्रीय एकता आणि मातृभूमीच्या रक्षणासाठीच्या अतूट निर्धाराची साक्ष देतो असं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे.

देशभरात आज कारगिल विजयादिनानिमित्त विविध कार्यक्रम होत आहेत.

**<><><><><>**

कारगिल विजय दिनानिमित्त सुरक्षित, सक्षम आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीचा निर्धार अधिक दृढ करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मन की बात कार्यक्रमातून देशवासियांना केलं. हा या कार्यक्रमाचा एकशे छत्तीसावा भाग होता. कारगिलच्या आव्हानात्मक परिस्थितीपेक्षा आपल्या सैनिकांचा ताठ कणा, दुर्दम्य साहस आणि अढळ आत्मविश्वास मोठा ठरला असं म्हणत त्यांनी हुतात्म्यांना आणि वीर सैनिकांना वंदन केलं.

त्यांच्या शौर्यगाथा नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशानं शौर्य विजय यात्रेचं आयोजन केल्याची माहिती त्यांनी दिली. एक यात्रा, एक राष्ट्र, एक सलाम हा संदेश देण्यासाठी दिल्लीतल्या राष्ट्रीय युद्ध स्मारकापासून निघालेली ही यात्रा कारगिलच्या युद्ध स्मारकापर्यंत जाणार आहे.

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं केलेल्या क्षेपणास्त्र चाचण्यांचा, तसंच अलिकडेच नौदलाच्या ताफ्यात दाखल झालेल्या स्वदेश निर्मित महेंद्रगिरी या युद्धनौकेचा उल्लेख करुन ते म्हणाले, भारताची संरक्षण उपकरणं आणि तंत्रज्ञानावर जगाचा विश्वास वाढत आहे.

कॅच द रेन मोहिमेच्या आवाहनाला भरघोस प्रतिसाद मिळत असल्याचं सांगून, त्याअनुषंगानं देशभर सुरु असलेल्या यशदायी प्रयत्नांची तसंच त्यामुळे घडून आलेल्या बदलांची उदाहरणं त्यांनी सांगितली. महाराष्ट्रात नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साठवण्याची क्षमता निर्माण करण्यात आल्याचा उल्लेखही त्यांनी केला.

पर्यावरण संवर्धनाच्या मुद्यावर बोलताना प्रधानमंत्र्यांनी सांगितलं, गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसऐवजी देशातल्या मातीपासून बनवलेल्या मूर्तींची पूजा करावी या आपल्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाला आहे, अशा मूर्तींची प्रतिष्ठापना ही निसर्गपूजाच ठरेल असं ते म्हणाले.

एक पेड माँ के नाम या उपक्रमाच्या सफलतेची उदाहरणंही त्यांनी दिली. रिड्यूस, रियूज आणि रीसायकल ही आज घोषणा नाही तर आपल्या जीवनाचा भाग बनली असल्याचं ते म्हणाले.

क्रीडा क्षेत्रात देशानं केलेल्या यशस्वी कामगिरीचा त्यांनी गौरव केला. जपान खुल्या बॅडमिंटन स्पर्धेचं विजेतपद पटकावणारी पहिली भारतीय बँडमिंटनपटू पी. व्ही. सिंधू, तसंच लॉर्ड्सवर झालेल्या पहिल्या महिला कसोटी क्रिकेट सामन्यात विजय मिळवणाऱ्या भारतीय संघाच्या कामगिरीचं कौतुक त्यांनी केलं. ब्रिटनमध्ये ग्लासगो इथं सुरु असलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करावी, आणि सर्वांची मन जिंकावीत अशा शुभेच्छा दिल्या.

अलिकडेच भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आणि गणित या विषयांच्या ऑलिम्पियाड स्पर्धांमध्ये भारतीय विद्यार्थ्यांनी केलेल्या गौरवास्पद कामगिरीचा

अभिमानपूर्वक उल्लेख त्यांनी केला. देशात ऑलिम्पियाड्स आणि हॅकेथॉनची संस्कृती विस्तारत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

**होल्ड बाईट - MKB Olympiyad**

येत्या ७ ऑगस्टला राष्ट्रीय हातमाग दिन साजरा होणार असून त्यानिमित्त त्यांनी श्रोत्यांना सांगितलं, की सरकारी प्रोत्साहनामुळे असंख्य कारागीर आणि विणकरांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आला आहे. गेल्या १२ वर्षांत खादीची विक्री सहा पट वाढली असून विक्रीचा आकडा आठ हजार कोटी रुपयांवर पोहोचला असल्याचं त्यांनी सांगितलं. येत्या सणासुदीच्या हंगामात खादी, हातमागाची उत्पादनं खरेदी करावीत, व्होकल फॉर लोकलनुसार स्थानिक उत्पादनांचा आग्रह धरावा, असं आवाहन त्यांनी केलं.

येत्या १५ ऑगस्टला स्वातंत्र्य दिनाच्या निमित्तानं 'हर घर तिरंगा या मोहीमेला उत्साहानं पुढे न्यावं, आपल्या घरी पूर्ण आदरानं तिरंगा फडकवावा असं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

युवावर्गानं कौशल्य विकासाच्या वाढीकडे विशेष लक्ष द्यावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केलं. नागपूरमध्ये कौशल्य केंद्राच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. पदवी आणि रोजगारक्षमता यात मोठा फरक असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. युवावर्ग योग्य कौशल्याअभावी हा रोजगार मिळवू शकत नाही, हे लक्षात घेऊन सरकारनं कौशल्य विकासाचे कार्यक्रम हाती घेतल्याचं त्यांनी सांगितलं. आपण महाराष्ट्रातच राहणार आहोत, असं बातमीदारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी स्पष्ट केलं. नागपूर परिसरात वेगानं वाढत असलेल्या विविध उद्योगांना या केंद्रामुळे कुशल मनुष्यबळ मिळू शकेल, असा विश्वास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

प्राप्तीकर विभागाच्या मुंबईतल्या आयकर सिंधू या कार्यालय संकुलाचं उद्घाटन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते आज मुंबईत झालं. करदात्यांनी दिलेल्या करांच्या साहाय्यानं देशाचं कोषागार या संकुलाच्या नावाप्रमाणे महासागराचं रूप घेत आहे, असं त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचा कार्यभार आज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी स्वीकारला. धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्यानंतर काल केंद्रीय ग्राहक व्यवहार आणि नागरीपुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याकडे शिक्षण मंत्रालयाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला.

**<><><><>**

नीट पेपरफुटी प्रकरणावरून देशव्यापी आंदोलन छेडणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपली एकता दाखवून देशाच्या लोकशाही इतिहासात सुवर्ण-अध्याय लिहिल्याचं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत शिवाजी पार्क इथं आयोजित युवा सभेला संबोधित करत होते. आपल्या हक्कांसाठी युवकांनी जागरूकता कायम ठेवावी, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

आजची ‘जेन-झी’, सरकारला आव्हान देऊ शकते, हे विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाने सिद्ध केल्याचं महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे यांनी यावेळी सांगितलं.

नीट पेपरफुटी प्रकरणावरून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल राजीनामा दिल्याच्या पार्श्वभूमीवर, आज मुंबईत शिवाजी पार्क इथं विद्यार्थी मोठ्या संख्येनं एकत्र आले होते.

नीट पेपरफुटी प्रकरणावरून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर, ठाणे शहर जिल्हा काँग्रेस समितीनंही काल 'विद्यार्थी विजय मार्च' आयोजित केला होता.

बुलढाणा जिल्ह्यात महाविकास आघाडी, शेतकरी संघटना, वंचित बहुजन आघाडी आणि इतर पक्षांनी देखील आनंदोत्सव साजरा केला.

**<><><><>**

दिल्लीत शांततापूर्ण मार्गानं आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना मारहाण प्रकरणी जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करणारं पत्र लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना लिहिलं आहे. आंदोलक विद्यार्थ्यांविरोधात पॅलेट गनसारख्या शस्त्रांचा वापर करण्याला गृहमंत्री या नात्यानं मंजुरी दिली होती का, असा प्रश्नही राहुल गांधी यांनी विचारला आहे.

दिल्लीत तैनात सुरक्षा दलं केंद्रीय गृहमंत्रालयाला उत्तरदायी आहेत, त्यामुळे या कारवाईला परवानगी कोणी दिली, विद्यार्थ्यांना मारहाण करणारे साध्या वेषातले लोक पोलीस

कर्मचारी होते की स्वयंसेवक, त्यांच्या तैनातीला कोणी मंजुरी दिली, असे प्रश्नही त्यांनी विचारले आहेत.

<><><><><>

कॉकरोच जनता पार्टीच्या अभिजीत दिपकेनं नीट परीक्षा पेपरफूटी विरोधात आंदोलन करून देशातल्या युवकांना सजग केलं आहे असं रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज लखनऊमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत सांगितलं. युवकांवर झालेल्या लाठीचार्जचं आपण समर्थन करत नाही असं ते म्हणाले. २६ नोव्हेंबरला संविधान दिनाच्या निमित्ताने लखनऊमध्ये रिपब्लिकन पक्षातर्फे एक पदयात्रा काढण्यात येईल आणि त्यात जवळजवळ १ लाख कार्यकर्ते सहभागी होतील असं ते म्हणाले. उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीसाठी आम्ही भाजपकडे ५ जागांची मागणी करू असं ते म्हणाले.

<><><><><>

झिम्बाब्वे बरोबरच्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेतला भारताचा तिसरा आणि शेवटचा सामना आज हरारे इथं होणार आहे. संध्याकाळी साडेचार वाजता खेळ सुरू होईल. काल झालेल्या दुसऱ्या सामन्यात भारतानं झिम्बाब्वेचा ९० धावांनी पराभव करून तीन सामन्यांच्या मालिकेत 2-0 अशी विजयी आघाडी घेतली आहे. भारतीय टी-20 संघाचा नवीन कर्णधार श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील हा पहिलाच मालिका विजय आहे.

//<><><><><>//